2 8 JUN 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्कूल ऑफ रुरल"च्या कोनशिलेचे अनावरण

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन : मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारतीचे प्रस्तावित बांधकाम वर्षभरात पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, अशी सूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केली.

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटची स्थापना करण्यात आली आहे. त्या माध्यमातून ग्रामीण विकासासाठी पूरक व दिशादर्शक असे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्यासाठी राज्य शासनाने भरीव निधीची तरतूद केली आहे. या विभागासाठी स्वतंत्र इमारत विद्यापीठाकडून प्रस्तावित करण्यात आली. त्या इमारतीच्या बांधकामास मंत्री पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू जयंतीचे औचित्य साधून प्रारंभ केला.



कोल्हापूर : इमारत बांधकामाच्या कोनशिलाचे अनावरण करताना मंत्री चंद्रकांत पाटील. सोबत कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. भारती पाटील आदी.

मंत्री पाटील यांच्या हस्ते स्कूलच्या इमारतीचे भूमीपूजन व कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. याप्रसंगी संबंधित इमारतीच्या नकाशांची पाहणी करून केवळ विद्यापीठातीलच नव्हे, तर परिसरातील एक आदर्श इमारत म्हणून याची उभारणी करावी, असेही त्यांनी सुचविले. तत्पूर्वी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांनी मंत्री पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे समन्वयक डॉ. नितीन माळी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जे. आर. पाटील, अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, उपअभियंता हेमा जोशी, ठेकेदार प्रशांत कदम, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. भारती पाटील उपस्थित होते.

### इमारतीविषयी थोडक्यात

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या प्रस्तावित इमारतीमध्ये तळमजला अधिक दोन मजले आहेत. पहिल्या टप्प्यातील तळमजल्याच्या बांधकामास सोमवारी प्रारंभ झाला. या इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे १० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी शासनाकडून पहिल्या टप्प्यात ५ कोटी ३५ लाख २८ हजार अनुदान दिले आहे. सार्वजनिक बांधकाममार्फतच इमारतीचे काम केले जाणार आहे.

28 JUN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. अभय बंग यांचे प्रतिपादन : सध्याचे शिक्षण निरुपयोगी

# बेरोजगारी टाळण्यासाठी जीवनानुभव कौशल्य शिक्षण काळाची गरज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : देशातील सध्याचे शिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी निरूपयोगी आहे. शिक्षक, प्राध्यापक जे शिकवतात ते अनुभवत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपण काय शिकलो, त्याचा कसा उपयोग करायचा हेच कळत नाही. परिणामी, सुशिक्षित बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढत आहे. हे टाळायचे असेल तर महात्मा गांधीजींच्या नई तालीम शिक्षणपद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना जीवनानुभव कौशल्य शिक्षण देणे गरजचे आहे, असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील गांधी अध्यासन केंद्राच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर व डॉ. नंदा पारेकर लिखित महात्मा गांधी व त्यांचे सांगाती, विजय तांबे लिखित गांधीजींचे लोकविलक्षण अनुयायी गोपराजू रामचंद्र राव या पुस्तकाचे मंगळवारी विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात डॉ. बंग यांच्या हस्ते प्रकाशन झाले. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ. बंग यांनी आजचे शिक्षण व महात्मा गांधी या विषयावर मांडणी केली. ते म्हणाले, गांधी व विनोबा भावे यांनी नई तालीम शिक्षणपद्धतीतून खऱ्या अर्थाने कौशल्याधारित शिक्षणव्यवस्थेची अपेक्षा धरली होती. मात्र, सध्या हे शिक्षण कुठेच मिळत नाही. आपल्याकडे शिक्षण दिले जाते, मात्र त्याचा उपयोग कसा करायचे हेच शिकवले जात नसल्याने सुशिक्षितांची संख्या वाढत आहे. महात्मा गांधी व त्यांचे सांगाती या पुस्तकातून गांधीजींचा लोकसंग्रह उलगडला आहे. हे पुस्तक खऱ्या अर्थाने गांधी यांच्या सहकाऱ्यांची ओळख करून देते.



शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी यांच्या अनुयायांविषयी दोन पुस्तकांचे प्रकाशन डॉ. अभय बंग यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदा पारेकर, डॉ. विलास शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, दशरथ पारेकर, डॉ. अशोक चौसाळकर, प्रसाद कुलकर्णी, डॉ. श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते.

यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पोवार, दशरथ पारेकर यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ लेखक डॉ. सुनीलकुमार लवटे, प्रा. राजन गवस, प्रसाद कुलकर्णी, अरुण भोसले, प्रा. डॉ. अवनीश पाटील, सुरेश शिपूरकर उपस्थित होते. गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. प्रा. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सुस्मिता खुटाळे हिने सूत्रसंचालन केले. प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

# शिक्षणासाठी 'नई तालीम' सक्षम पर्याय

## डॉ. अभय बंग; शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान


कोल्हापूर, ता. २७ : 'सध्याची शिक्षण व्यवस्था नोकरी, रोजगार आणि आर्थिक सक्षमता देण्यास अक्षम आहे. या व्यवस्थेची स्थिती दयनीय असून ती सुधारण्यासाठी 'नई तालीम' सक्षम पर्याय आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात 'आजचे शिक्षण आणि महात्मा गांधी यांचे उपाय' या विषयावर मानव्यशास्त्र सभागृहात आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. बंग म्हणाले, 'महात्मा गांधींच्या अनुभवातून नई तालीम शिक्षणप्रणाली उदयास आली. त्या संकल्पनेचा विकास विनोबांनी केला. महात्मा गांधी यांना पाहू शकलो नसल्याचे आयुष्यभराचे दुःख असले तरी त्यांनी सुरू केलेल्या शाळेत विनोबांकडून शिकलो, ही पुण्याई आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट आपल्याला जीवनातच शोधावे लागते, हा नई तालीमचा गाभा आहे. शरीरश्रम, बुद्धीला चालना यांसह प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या शिक्षणाला अशा प्रकारे गांधीजींनी नई तालीमचे स्वरुप दिले. ज्ञान हे प्रत्येकामध्ये आहेच, फक्त त्यावरील अज्ञानाची पुटे काढून टाकण्याचे काम शिक्षकाला करावयाचे असते. यातून मी कोण आहे, हे समजणे म्हणजे शिक्षण आहे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'नई तालीम ही महात्मा गांधी यांनी जगाला दिलेली सर्वोत्तम भेट आहे. शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आजच्या धुरिणांनी तिची आजच्या परिप्रेक्ष्यामध्ये कशा प्रकारे अंमलबजावणी करता येऊ शकेल, या दृष्टीने चिंतन करण्याची गरज आहे.'

या कार्यक्रमात डॉ. नंदा पारेकर लिखित 'महात्मा गांधी आणि त्यांचे सांगाती' आणि विजय तांबे लिखित 'महात्मा गांधींचे लोकविलक्षण अनुयायी : गोपराजू रामचंद्र राव' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील यांनी या पुस्तकांविषयी विवेचन केले. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी आयोजित विशेष व्याख्यानात डॉ. अभय बंग यांनी विचार मांडले. यावेळी शेजारी डॉ. अशोक चौसाळकर, दिगंबर शिर्के, प्रमोद पाटील, विलास शिंदे आदी उपस्थित होते.

### खडबडून जागे व्हावे अशी स्थिती

- शिक्षणाच्या बाबतीत खडबडून जागे व्हावे, अशी स्थिती आजच्या भोवतालामध्ये आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या शिक्षणाला नई तालीमचे स्वरुप देणाऱ्या गांधीजींच्या शैक्षणिक संकल्पनेची प्रस्तुतता अबाधित असल्याचे डॉ. बंग यांनी सांगितले.

पुढारी

# म. गांधी यांच्या 'नई तालीम'ची प्रस्तुतता अबाधित : डॉ. बंग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिक्षणाबाबत खडबडून जागे व्हावे अशी स्थिती आज आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष जीवनात घडणाऱ्या शिक्षणाला नई तालीमचे स्वरूप देणाऱ्या गांधीजींच्या शैक्षणिक संकल्पनेची प्रस्तुतता अबाधित आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. अभय बंग यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात 'आजचे शिक्षण व महात्मा गांधी यांचे उपाय' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. बंग म्हणाले, महात्मा गांधींच्या अनुभवातून नई तालीम शिक्षणप्रणाली उदयास आली. त्या संकल्पनेचा विकास विनोबांनी केला. शिक्षणाचे उद्दिष्ट जीवनातच शोधावे लागते, हा नई तालीमचा गाभा आहे. या शाळेमध्ये विद्यार्थ्यांना जबाबदारी व बौद्धिक आव्हान दिले जायचे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नई तालीम ही महात्मा गांधी यांनी जगाला दिलेली सर्वोत्तम भेट आहे. गांधी अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

28 JUN 2023


पुण्यनगरी

# बँकांच्या प्रगतीसाठी छत्र संस्था महत्त्वाची : अतुल खिरवाडकर

## शिवाजी विद्यापीठामधील कार्यक्रमास प्रतिसाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नागरी सहकारी बँकांसमोर वृद्धी साधण्याचे मोठे आव्हान आहे. त्यादृष्टीने रिझर्व्ह बँकेने नॅशनल को-ऑपरेटिव्ह फायनान्शियल अँड डेव्हलपमेंट कंपनी (एनसीएफडीसी) ही छत्र संस्था निर्माण करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्याचा लाभ घेऊन सर्व नागरी सहकारी बँकांनी एकत्र येऊन प्रगती साधावी, असे आवाहन या छत्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर यांनी केले.



**कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. राजेंद्र पडवळ, धनंजय गोखले, अतुल खिरवाडकर, महेश धर्माधिकारी व निपुण कोरे.**

विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'छत्र संस्था आणि नागरी सहकारी बँकांसमोरील रिझर्व्ह बँकेशी निगडित समस्या समजून घेताना' या विषयावर ते बोलत होते.

खिरवाडकर म्हणाले, देशातील अवघ्या ११ राज्यांत सहकारी बँका आहेत. बँकांची संख्या २२०० वरून १४०० झाली आली आहे. आणखीही ६०-७० बंद होण्याच्या मार्गावर आहेत. नागरी सहकारी बँकांची आवश्यकता असताना नेमके कोठे चुकते आहे, याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, विद्यापीठात बँकिंगशी निगडित केंद्रे आहेत. त्यांच्या माध्यमातून विद्यापीठ आणि बँकिंग विश्व यांचे सहसंबंध दृढ होण्यासाठी प्रयत्न केले जातात.

असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे, मुंबईचे लेखापरीक्षक धनंजय गोखले, रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी अविनाश जोशी यांनीही मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजेंद्र पडवळ यांनी स्वागत केले. महेश धर्माधिकारी यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
2 8 JUN 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरी सहकारी बँकांसमोर वृद्धी साधण्याचे आव्हान

## अतुल खिरवाडकर; विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नागरी सहकारी बँकांसमोर वृद्धी साधण्याचे मोठे आव्हान आहे. त्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने नॅशनल को-ऑपरेटिव्ह फायनान्शियल अँड डेव्हलपमेंट कंपनी ही छत्र संस्था निर्माण करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. त्याचा लाभ घेऊन सर्व नागरी सहकारी बँकांनी एकत्र येऊन प्रगती साधून घ्यावी, असे आवाहन या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ बँक ऑफ इंडिया अध्यासन, लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र व कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'छत्र संस्था व नागरी सहकारी बँकांसमोरील रिझर्व्ह बँकेशी निगडित समस्या समजून घेताना' या विषयावर एकदिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमात बोलताना अतुल खिरवाडकर.**

खिरवाडकर म्हणाले, भारतातील २८ राज्यांपैकी ११ राज्यांत सहकारी बँका आहेत. केंद्रशासित प्रदेशांत अथवा ईशान्येकडील राज्यांत एकही सहकारी बँक नाही. गेल्या २७ वर्षांपासून नागरी सहकारी बँकांची संक्रमणावस्था संपलेली नाही. या काळात बँकांची संख्या २,२०० वरून १,४०० पर्यंत खाली आली आहे. आणखी ६०-७० बंद होण्याच्या मार्गावर आहेत. प्रत्यक्षात देशातील व्यापक लोकसंख्येला नागरी सहकारी बँकांची आवश्यकता असताना नेमके कोठे चुकत आहे, याचा विचार करण्याची गरज आहे. दास कमिटीने सर्वप्रथम नागरी सहकारी बँकांसाठी छत्र संस्थेची शिफारस केली. त्यातून ही संस्था वर्षाअखेरपर्यंत कार्यान्वित होईल.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, या पुढील काळात दोन क्षेत्रांनी एकत्र येऊन सहकारी बँकिंग हे नव्या युगाचे बँकिंग म्हणून नव्या पिढीशी जोडण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. या क्षेत्रात चांगले मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बँकिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना इंटर्नशीप कशी मिळवून देता येईल, या दृष्टीने धोरण आखता येऊ शकेल. असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे, मुंबईचे लेखापरीक्षक धनंजय गोखले, रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी अविनाश जोशी यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजेंद्र पडवळ यांनी स्वागत केले. महेश धर्माधिकारी यांनी प्रास्ताविक केले.

28 JUN 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नागरी सहकारी बँकांनी संघटित प्रगती करावी : खिरवाडकर

## शिवाजी विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर, ता. २७ :** 'रिझर्व्ह बँकेने नॅशनल को-ऑपरेटिव्ह फायनान्शियल अॅण्ड डेव्हलपमेंट कंपनी (एन.सी.एफ.डी.सी.) ही छत्र संस्था निर्माण करणार आहे. त्याचा लाभ घेऊन नागरी सहकारी बँकांनी प्रगती साधावी', असे प्रतिपादन छत्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल खिरवाडकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे बँक ऑफ इंडिया अध्यासन, गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशनतर्फे 'छत्र संस्था आणि नागरी सहकारी बँकांसमोरील रिझर्व्ह बँकेशी निगडित समस्या समजून घेताना' या विषयावर एकदिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रम घेण्यात आला. त्यामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे प्रमुख उपस्थित होते.

खिरवाडकर म्हणाले, 'नागरी सहकारी बँकांसमोर वृद्धी साधण्याचे मोठे आव्हान आहे. प्रत्यक्षात देशातील व्यापक लोकसंख्येला नागरी सहकारी बँकांची आवश्यकता असताना, नेमके कोठे चुकते आहे, याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली. त्या गरजेतून विविध समित्या नेमून परिस्थितीचा वेध घेण्यात आला. दास कमिटीने सर्वप्रथम नागरी सहकारी बँकांसाठी छत्र संस्थेची शिफारस केली. त्यातून ही संस्था या वर्षअखेरपर्यंत कार्यान्वित होते आहे. देशातील नागरी सहकारी बँकांना संघटित करणे आणि त्यांच्या समस्या सोडविण्यास सहाय्य करणे, असे प्रमुख हेतू त्यामागे आहेत. बँका संघटित झाल्यास चमत्कार घडविण्याची त्यांची क्षमता सिद्ध होईल'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठात बँकिंगशी निगडित केंद्रे आहेत. त्यांच्या माध्यमातून विद्यापीठ आणि बँकिंग विश्व यांचे सहसंबंध दृढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात.' यावेळी निपुण कोरे, मुंबईचे लेखापरीक्षक धनंजय गोखले, रिझर्व्ह बँकेचे निवृत्त अधिकारी अविनाश जोशी यांनी मार्गदर्शन केले. विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. राजेंद्र पडवळ यांनी स्वागत केले. महेश धर्माधिकारी यांनी प्रास्ताविक केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमात अतुल खिरवाडकर यांनी मार्गदर्शन केले.**

### बँकांची संक्रमणावस्था संपेना

**'भारतातील २८ राज्यांपैकी अवघ्या ११ राज्यांत सहकारी बँका आहेत. गेली २७ वर्षे झाली, नागरी सहकारी बँकांची संक्रमणावस्था संपतच नाही. या काळात या बँकांची संख्या २२०० वरून १४०० पर्यंत खाली आली आहे. आणखीही ६०-७० बंद होण्याच्या मार्गावर आहेत', असे खिरवाडकर यांनी सांगितले.**

पुण्यनगरी

# उद्या होणाऱ्या परीक्षा रविवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे गुरुवार, दि. २९ जून रोजी बकरी ईदनिमित्ताने सुटी जाहीर केली आहे. त्यामुळे त्या दिवशीचे सर्व पेपर रद्द केले आहेत. हे पेपर रविवार, दि. २ जुलै रोजी यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या वेळेनुसार होतील, तसेच दि. ३० जूनपासूनचे पेपर नियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशी माहिती परीक्षा विभागाने दिली आहे.

पुण्यनगरी

# तंत्रज्ञान विभागामधील विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधून २०२२-२३ या वर्षी ११० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्हमधून अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राधान्य मिळण्यासाठी, तसेच अधिविभाग औद्योगिक संशोधन केंद्र बनावे यासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांना रोजगार संधी मिळाव्यात यासाठी विभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल अधिकारी गणेश पाटील आदी कार्यरत आहेत.

पुढारी

# विद्यापीठाकडून पदवीच्या ११६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवीच्या ११६ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षा सध्या सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ सायन्स (टेक्नॉलॉजी), मास्टर ऑफ रूरल स्टडीज, बॅचलर ऑफ व्होकेशन, मास्टर ऑफ वुमेन स्टडीज आदी २३ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातून ४ हजार २४६ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. दरम्यान, पीजी डिप्लोमा इन न्यूट्रिशन, बॅचलर ऑफ डिझाईन, नर्सिंग, ऑटोमोबाईल, प्रिंटिंग अँड पब्लिकेशन, सस्टिनेबल ॲग्रीकल्चर आदी १७ अभ्यासक्रमांचे निकाल मंगळवारी जाहीर झाले आहेत. भरारी पथकाकडून तीन गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे.

सकाळ

# 'पदवी' परीक्षेतील गुरुवारचे पेपर रविवारी होणार

बकरी ईद निमित्त गुरुवारी (ता. २९) सार्वजनिक सुटी जाहीर झाली आहे. त्यामुळे पूर्वनियोजनानुसार यादिवशी होणारे पदवी अभ्यासक्रमांचे पेपर आता रविवारी (ता. २ जुलै) घेण्यात येणार आहेत. ते पेपर यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या वेळेनुसार होतील. ता. ३० जूनपासूनचे पेपर नियोजित वेळापत्रकानुसार होणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.